ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

# वाचन

**डॉ. लता पांडुरंग मोरे**

*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग प्रमुख, राजर्षी शाहू कला व वाणिज्य महा., रुकडी ता.हातकणंगले जि. कोल्हापूर*

हिंदी आणि मराठीचे जेष्ठ लेखक, संशोधक, संपादक, अनुवादक, प्रशासक, मार्गदर्शक म्हणून साहित्य आणि सामाजिक क्षेत्रात डॉ. सुनीलकुमार लवटे सुपरिचित आहेत. त्यांचा 'वाचन' हा ग्रंथ वाचनाविषयी सैद्धांतिक मांडणी करणारा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. वाचनाची उत्पत्ती आणि प्रक्रियेचा पट उलगडणारा तसेच वाचनाची सैद्धांतिक मांडणी करणारा, मानवी जीवनातील 'वाचन' या क्रियेचे महत्त्व विशद करणारा, तसेच वाचनाशी निगडीत सैद्धांतिक मांडणी करणारा हा महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे. पाच प्रकरणे आणि परिशिष्टे असणाऱ्या या ग्रंथात केवळ वाचनाविषयीची माहिती नसून माणसाच्या व्यक्त होण्याच्या इतिहासापासून ते ग्रंथ निर्मिती आणि ग्रंथालयापर्यंतची सर्वंकष माहिती समाविष्ट आहे. माणूस भाषेमुळे प्राण्यापेक्षा अधिक प्रगतशील बनला आहे. ही भाषा विकसित करण्यासाठी त्याला प्रचंड मोठा कालावधी लागला. मनातलं व्यक्त करण्याच्या भावनेतून आदिमानवापासून आजपर्यंत मारलेली मजल या ग्रंथात आली आहे.

CC BY Aarhat Publication & Aarhat Journals is licensed Based on a work at http://www.aarhat.com/amierj/

'माणसाचं व्यक्त होणं' या पहिल्या प्रकरणामध्ये माणूस आणि प्राणी यांच्यामध्ये अंतर निर्माण करणारे भाषा, विचार, बुद्धी, अभिव्यक्ती आणि अविष्कार या घटकांच्या अनुषंगाने मांडणी करत माणसाचे बोलणे, बहुभाषिकत्त्व, भाषा विकासाच्या संदर्भातील मुलभूत प्रश्न, भाषिक विकास या विषयी आढावा घेतला आहे.

'लोकसाहित्य : उगम आणि विकास' या प्रकरणात लोकवाड.मय या प्राचीन साहित्याचे महत्त्व, इतर शास्त्राच्या अभ्यासासाठीचे उपयुक्त साधन, लोकसाहित्याचे प्रकार आणि त्यामध्ये समाविष्ठ होणाऱ्या घटकांची सखोल चर्चा केली आहे. अल्पाक्षरी जीवन वास्तव आणि भेद स्पष्ट करण्याच्या स्वयंप्रेरणेतून निर्माण होणाऱ्या या साहित्याचे उद्दिष्ट समाजशिक्षण आहे, हे या प्रकरणात स्पष्ट केले आहे.

'लेखन विकास' हे या पुस्तकातील तिसरे प्रकरण उत्कंठा वाढविणारे आहे. माणसाला प्राचीनकाळी अभिव्यक्त होण्याचा छंद कसा जडला याचा शोध या प्रकरणात घेतला आहे. मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. प्राचीन काळापासून त्याने विविध मार्गाने समाजाशी संबंध विकसित केले. आपल्या स्मृती, घटना,

प्रसंगाचे चित्रण त्याने चिन्ह, चित्र, संकेत, इ. द्वारे कोरून ठेवले. चित्रातून आपल्याला अभिव्यक्त होता येते आणि ते दुसऱ्याला कळते याची प्रचीती आल्यानंतर अभिव्यक्त होण्याचा त्याला छंद जडला. जगातील सर्वाधिक प्राचीन लेखनकला मेसोपोटेमियामध्ये क्युनिफॉर्म लिपीच्या माध्यमातून झाली. यावेळी आर्थिक नोंदीसाठी चिखलाचे ठोकले वापरले गेले. याशिवाय पपायरस, भूर्जपत्रे, चामडे, शाई, रंग, कागद, इ. चा वापर होत असे. या प्रकरणात लेखनाच्या उगमापासून विविध लिप्यांचा विकास सांगत लेखक वाचकाला अचंबित करत, लिप्यांच्या विश्वाचा प्रवास घडवून आणतो.

लिपी हे काळाचे प्रतिरूप असते. गतकाळ जिवंत करण्याची क्षमता तिच्यात असते. माणसाच्या व्यक्त होण्याच्या बेचैनिमधून तिची निर्मिती झाली. जंगलात राहणारा आदिमानव गुहेत राहायला लागल्यानंतर फुरसतीच्या काळात गुहांमध्ये चित्रे काढू लागला. ही चित्रे म्हणजे त्याच्या मनातील भाव आणि विचारांची अभिव्यक्ती होती. एका अर्थाने ती त्याची चित्रलिपी होती. आदिमानवाने केलेले हे चित्रांकन म्हणजे त्याची लिपी होती. या प्रकरणामध्ये लेखकाने भारतीय भाषा आणि तिच्या लिप्याविषयी सविस्तर चर्चा केली आहे. भारतातील ३० संघराज्ये आणि ६ केंद्राशासित प्रदेशाच्या राज्यकारभारासाठी वापरण्यात येणाऱ्या २२ भाषा आणि १३ लिप्यांची माहिती दिली आहे. ही सर्व माहिती लिपींचा अभ्यास करणाऱ्यांसाठी मेजवानी आहे.

भारतीय भाषा आणि लिपी याविषयी माहिती देताना लिखाकाने भारतीय लिपींचा उगम आणि विकास यांचा आढावा घेऊन लिपी अभ्यासाच्या उद्देशाची सविस्तर माहिती सांगितली आहे. या ग्रंथामधील प्राचीन लिप्यांचा अभ्यास थक्क करणारा आहे. अत्यंत सोप्या भाषेत व सविस्तर पद्धतीने भारतीय लिपींची माहिती दिली आहे. त्यामुळे भारतीय लिप्यांचे खूप मोठे स्वरूप नजरेसमोर उभे राहते. सम्राट अशोकाच्या शिलालेखातील खरोष्टी लिपी आणि ब्राम्ही लिपीतील साधर्म्य नोंदवत लेखकाने ब्राम्ही लिपीच्या उत्तरीशैली आणि दक्षिणीशैलीतील झालेला विकास स्पष्ट केला आहे. उत्तरीशैलीतील लिप्यांमध्ये – गुप्तलिपी, कुटीललिपी, नागरीलिपी, शारदालिपी, बंगालीलिपी आणि दक्षिणीशैलीतील लिप्यांमध्ये – पश्चिमी लिपी, तेलगु आणि कानडी लिपी, ग्रंथ लिपी, तमिळ लिपी, वट्टेकुत्तु लिपी या लिप्या केंव्हा उदयास आल्या? त्यांचे पूर्वरूप कोणते? कोणत्या लिपीत त्यांचे साधर्म्य आहे? कोणत्या प्रदेशात त्या प्रामुख्याने वापरल्या गेल्या? याची इत्यंभूत माहिती या प्रकरणात दिली आहे. ही माहिती लीपिंच्या अभ्यासकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

पुस्तकं माणसांचा कायाकल्प घडवून आणतात. ते आपली आयुष्यभर पाठराखण करतात. डॉ. लवटे म्हणतात, "जीवन सभ्य, समंजस, सहिष्णू, सदाचारी सतशील बनवायचं तर पुस्तकांना पर्याय नाही." (पृ. ४२) ग्रंथांमध्ये मनुष्यजीवन सकारार्थी बनविण्याची ताकद असते. 'ग्रंथ निर्मिती आणि ग्रंथालय विकास' या प्रकरणामध्ये मानवाने ग्रंथापर्यन्तची मारलेली मजल याच्या इतिहासबरोबरच ग्रंथाचा अर्थ, व्युत्पत्ती, व्याख्या,

ISSN–2278-5655

AMIERJ

Aarhat Multidisciplinary International Education Research Journal

Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

स्वरूप आणि व्याप्ती सांगितली आहे. विशेष म्हणजे प्राचीन काळातील इष्टीका ग्रंथ (क्युनीफॉर्म), लेखन साहित्य, गुंडाळी स्वरूपातील ग्रंथ आणि त्याच्यासाठीचे कपाट, संग्रहग्रंथ ठेवण्याचे कपाट, इ. ची सचित्र माहिती समाविष्ट केली आहे. यामुळे वाचकांच्या नजरेसमोर प्राचीन काळातील ही साधन सामुग्री जशीच्या तशी नजरेसमोर उभी रहाते. या प्रकरणामध्ये इष्टीकाग्रंथ (क्युनीफॉर्म) ते मुद्रितग्रंथ आणि त्याही पलीकडे ऑनलाईन ग्रंथ, किंडलपर्यंतची ग्रंथप्रगती सांगितली आहे. तसेच ग्रंथ निर्मितीपासून ग्रंथ वाचनाच्या पद्धतीवर प्रकाश टाकला आहे. यामध्ये बाळबोध वाचनापासून व्यासंगी अभ्यासक, संशोधक, समीक्षक यांच्या सारभूत वाचनाचे स्वरूप स्पष्ट केले आहे. चोखंदळ वाचकांच्या वाचनाच्या पद्धतीही गुण-दोषासह स्पष्ट केल्या आहेत. वाचन विचार कसा असावा याविषयी लवटे यांचे मत खूप उद्बोधक आहे. ते म्हणतात, “वाचनाचा विचार भूतकाळाच्या पार्श्वभूमीवर, वर्तमानाचे भान ठेवून, भविष्यवेध घेतच करायला हवा, तरच वाचन संस्कृती टिकेल व भविष्यात ती वर्धिष्णू राहील.” (पृ. ६२) या प्रकरणामध्ये ग्रंथाविषयी सर्व काही सांगताना ग्रंथालयाचा उगम आणि विकास याचा धावता आढावा घेतला आहे. त्यामुळे यातून प्राचीन काळ ते आजपर्यंतचा ग्रंथ विकास लक्षात येतो.

या पुस्तकातील ‘वाचन स्वरूप आणि व्याप्ती’ हे प्रकरण केंद्रबिंदूसारखे आहे. वाचन ही ज्ञानप्राप्तीची, आकलनाची पद्धत आहे. तिच्याद्वारे आपणास जगाची माहिती होते, विविध जाणीवा जागृत होतात. अज्ञान दूर होण्याबरोबरच मनोरंजनही होते. वाचन ही भाषिक, वाचिक तसेच मानसिक कृती असते, ती एक ज्ञानप्रक्रिया असते, तसेच ते कौशल्यही असते. वाचनामध्ये एक सुप्त शक्ती असते. त्यामुळे माणसाचे अंतरंग व बाह्यांग प्रभावित होते. वाचनानंतर माणसाला आपण पूर्वीपेक्षा शहाणे व समजदार वाटते. वाचन ही क्रिया बहुआयामी असते. एकाच वेळी तिचा संबंध शारीरिक, मानसिक, भावनिक, तात्त्विक, तार्किक असा विविधांगी असतो. वाचन ही सजीव आणि निरंतर प्रक्रिया आहे. बोध आणि अबोध स्वरुपात ती सतत चालू असते. वाचन हे व्यक्ती सापेक्ष असते, म्हणजेच वाचणारी व्यक्ती मजकूर कसा आत्मसात करते यावर ते अवलंबून असते.

वाचनाचे स्वरूप आणि व्याप्ती सांगताना लेखकाने प्रभाव, कृती, कला, विज्ञान, अंकीयवाचन (Digital Reading) या संदर्भाने सविस्तर चर्चा केली आहे. या चर्चेत माणूस भाषा नसण्याच्या काळात देहबोलीने मत सूचित करायचा आणि सध्या चॅट, व्हाटसप, फेसबुक, ट्विटरच्या जमान्यात इमोजीद्वारे किंवा मराठीतील संदेश इंग्रजी लिपीत किंवा आद्याक्षराद्वारे पाठविलेले असतात. हे संदेश तर्काने वाचावे लागतात. त्यामुळे आपला भाषेचा प्रवास उलट गतीने चालला आहे असे नोंदवत, लेखकाने सद्य परिस्थितीत वाचन संस्कृती बिघडत चालली आहे, तसेच ती कमी होत आहे हे सांगून ती कशी वाढवता येईल याविषयी उपाययोजना सांगतली

आहे. याविषयी डॉ. लवटे म्हणतात, “ॲप्स, किंडल, मोबाईल्स, टीव्ही, सिनेमा यामुळे वाचनाची सजीवता गमावत निर्जीव झाल्याने सजीव माणसाचे वाचन निरंक (Nil) होत आहे. कागद, पेन, पेन्सिल, पाटी, पुस्तक पुन्हा देणे यावरचा उपाय होय.” (पृ. ७४) वाचनप्रक्रिया लिखित, मुद्रित, किंवा अंकीय मजकूर आणि वाचक यांच्यातील सहसंबंधातून आकाराला येत असते. वाचन कौशल्यांचा विकास सर्वग्राही, सर्वंकष वाचनातून होतो. यासाठी प्रभावी वाचनाबरोबरच वाचानानंतरच्या पाठपुराव्याची म्हणजेच सारांशीकरण, क्रमवारी, अनुमान, तुलना, अन्वय, इ. गोष्टींची आवश्यकता असते.

या ग्रंथामध्ये वाचनाच्या उद्देश व स्वरूपानुसार वाचन प्रकारांची चर्चा केली आहे. यामध्ये सहजवाचनापासून ते कटाक्षवाचनापर्यंत अनेक वाचन प्रकारांचा समावेश केला आहे. सृजनात्मक वाचन हा वाचन प्रकार असला तरी तो वाचन विषयक दृष्टिकोन आहे. याविषयीचा विचार जगात सर्वात प्रथम इमर्सन यांनी इ.स. १८३७ मध्ये केला. सृजनात्मक वाचन म्हणजे आपण जे वाचतो त्याच्यातील नव्या आशयाचा शोध घेण्याची वृत्ती होय. सृजनात्मक वाचनाचा जन्म नव्या आशयाच्या मांडणीच्या ध्यासातून होतो. सृजनात्मक लेखन हे सृजनात्मक वाचनावर अवलंबून असते. थोडक्यात सृजनात्मक वाचनाची सुरुवात जिज्ञासेने होते, तर त्याची फलश्रुती निर्मितीने होते. या प्रकरणात वाचन अध्यापन प्रक्रिया कशी असते याची सविस्तर चर्चा केली आहे. यामध्ये वाचनाच्या प्राथमिक घटकाबरोबरच वाचन अध्यापन पद्धतीचा उहापोह केला आहे. वाचन वैविध्यामध्ये पुस्तक वाचन एवढाच भाग अंतर्भूत नसून आपण जीवनात पुस्तकांच्या पलीकडच्या अनेक गोष्टींचे वाचन करतो, त्यांच्या पद्धती व उदाहरणे सांगितली आहेत. जसे भाववाचन, निसर्गवाचन, चित्रवाचन, चरित्रवाचन, निरंतरवाचन, अमूर्तवाचन, हालचालींचेवाचन, छाया-प्रकाशवाचन, आत्मवाचन, इ. वाचन पद्धतींचा शोध घेतला आहे. वाचनाविषयी डॉ. लवटे म्हणतात, “वाचन म्हणजे जीवन सर्वतोपरी समजण-उमजण ते ज्यांना कळल तो खरा वाचक.” (पृ.९८) पुस्तकाच्या पलीकडचे हे वाचन लेखकाच्या निरीक्षण शक्तीची आणि सूक्ष्म नोंदीची ग्वाही देते.

वाचन विकास ही माणसाच्या हजारो वर्षांच्या सामाजीकरण प्रक्रियेतून विकसित झालेली प्रक्रिया आहे. या प्रकरणामध्ये वाचनाचा विकास कसा होत गेला हे स्पष्ट करत लेखकाने वाचन ही एक विद्याशाखा कशी आहे हे स्पष्ट केले आहे. या विद्याशाखेमध्ये वाचन अध्यापन कसे होते याची सविस्तर चर्चा केली आहे. सुमारे ६००० वर्षापूर्वी वाचनाचा प्रारंभ झाला. तेंव्हा भाषा नव्हती पण सुट्टे शब्द होते. इ.स. पूर्व २००० मध्ये मुळाक्षरांची निर्मिती झाली आणि भाषाविषयक प्रगती होत, १९ व्या शतकात शिक्षण व्यवस्थेची निर्मिती झाल्यामुळे वाचन हे जगण्याचे साधन बनले. २१ व्या शतकात इलेक्ट्रोनिक युगात ई - बुक्स, गुगल, किंडल, मायक्रोसॉफ्ट, लॅपटॉप, मोबाईल, इ.च्या माध्यमातून माणूस २४ तास वाचक कसा बनला याचे विवेचन केले आहे. ई-बुक,

ISSN–2278-5655
AMIERJ
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–X, Issues– II Jan –Feb 2021

ई-रीडिंग, ई-रीडर्स त्याचे फायदे या प्रकरणात नोंदवले आहेत. याविषयीच्या तोट्यांची कल्पना देताना डॉ. नंदकुमार मोरे म्हणतात, “ई-बुकचे फायदे सांगताना फसगत झालेली आहे.....त्यामुळे या माध्यमाच्या सामर्थ्याबरोबर मर्यादांचीही ओळख वाचकांना होणे आवश्यक आहे.” (पृ.१६९) सध्याची वास्तव परिस्थिती पाहता डॉ. मोरे यांचे मत अगदी बरोबर आहे. परंतु वाचन संस्कृती जपण्यासाठीच्या उपाय योजना स्पष्ट करताना डॉ.लवटे यांनी पुस्तक हाच पर्याय आहे असे सुचवताना म्हटले आहे की, “पान पलटताना बोटांना होणारी स्पर्श भावना, पुस्तकाच्या निकटतेने येणारा वास, हालचाल,पलटणे, उलटणे, चाळणे यात जी आत्मीयता आहे, ती ई-कंटेंट देत नाहीत. शिवाय इलेक्ट्रॉनिक साधने गतीचा ससेमिरा लावतात. या सर्वावर रामबाण उपाय म्हणजे परत पुस्तक हाती देणे हाच आहे.” (पृ.७४)

या पुस्तकात वाचन व्यवहाराच्या अनुषंगाने उक्ती, सुभाषिते, सुविचार, घोषवाक्ये दिली आहेत. या बरोबरच प्रसिध्द लेखकांचे, विचारवंतांचे विचार समाविष्ट केले आहेत. हे सर्व वाचन प्रक्रिया समजून घेण्यासाठी महत्त्वाचे आहेत. याशिवाय या पुस्तकात काही परिशिष्टे जोडली आहेत. यातील ‘वाचकांचे हक्क’ या पहिल्या परीशिष्ठामध्ये आपल्या हक्कांचे आकलन होते. दुसऱ्या परिशिष्टात युनेस्को तर्फे प्रकाशित झालेल्या ‘दि बुक चार्टर’ या पुस्तिकेचा स्वैर अनुवाद असून ‘ग्रंथ सनद’ या नावाने समाविष्ट केला आहे. तिसरे परिशिष्ट ‘वाचन सुभाषितांचे’ आहे तर चौथ्या परिशिष्टात वाचन प्रक्रियेविषयी लेखकाची दीर्घ कविता आहे. या कवितेत ‘पुस्तक हे माणसाच्या जगण्याचे अविभाज्य अंग असते’ असे सूचित केले आहे. पाचवे परिशिष्ट संदर्भ सूचीचे आहे. या सर्व परिशिष्टातून लेखकाची चिंतनशीलता, गुणग्राहकता,
व्यासंग, इंग्रजीवरील प्रभुत्व लक्षात येते.

थोडक्यात ‘वाचन’ हे पुस्तक म्हणजे वाचन संस्कृती, वाचन चळवळ बळकट करण्याची एक विधायक कृती आहे. आकर्षक मुखपृष्ठ आणि विचार करायला लावणारा मलपृष्टावरील संदेश वाचकांना पुस्तक खरेदी करण्यासाठी उद्युक्त करायला लावणारा आहे. वाचन प्रक्रियेविषयी कुतूहल जागृत करणारा, शास्त्रीय आणि संशोधनात्मक मांडणी करणारा हा ग्रंथ मराठीतील एक महत्त्वपूर्ण ग्रंथ आहे.

**संदर्भ :-**

१) लवटे डॉ. सुनीलकुमार, भाग्यश्री प्रकाशन, कोल्हापूर तृतीय.आ. २०१९.